# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू आंधळ्याला बरे करतो



लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen

60 गोष्टींतील 50 (पहिली)

www.M1914.org

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

बार्तीमय नावाचा एक आंधळा मनुष्य होता, तो यरिहोला जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला बसून भिक मागत असे.



1

त्या रस्त्याने जाणारे काही दयाळू वृत्तीची माणसे त्याला थोडेसे पैसे किंवा खाण्यासाठी काही देत असत. बार्तीमयला दृष्टी नसल्यामुळे काम करु शकत नव्हता. तो केवळ भिक मागू शकत होता.



2

एके दिवशी, रस्ता फारच व्यस्त होता. बार्तीमयने चालतांना पुष्कळ लोकांच्या पायाचा आवाज ऐकला. दररोज न घडणारे काहीतरी घडत होते.



3

लवकरच तो आवाज काय आहे हे त्या आंधळ्याला कळले. नासरेथकर येशू त्या गावात आला होता. येशूला पाहण्यासाठी व त्याचे ऐकण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती.



4



"येशू, दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा !" असे बार्तीमय का ओरडू लागला? येशू त्याला मदत करेल असे त्याला का वाटले असावे?

5



येशूने इतरांना बरे केले; काही बहिरे होते, काही मुके होते, काही लुळे-पांगळे होते, तर काही त्याच्यासारखे आंधळे होते, त्यांच्याविषयी कदाचित त्याने ऐकले असावे. "दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा" असे बार्तीमय परत आणि परत ओरडत होता. त्याच्या आवाजात आशेचा ध्वनी होता.

6



बार्तीमयला एका गोष्टीची खात्री होती. जर त्याला आता मदत मिळाली नाही तर कदाचित त्याला दुसरी संधी मिळणार नव्हती. त्या रस्त्याने येशू कदाचित पुन्हा जाणारच नव्हते.

7



बार्तीमयला येशू पर्यंत पोचणे आवश्यक होते. परंतू लोक त्याला पुढे जाण्यासाठी जागा देत नव्हते. ते म्हणाले, "हश्SSSSS!" त्याने गप्प राहावे म्हणून त्यांनी त्याला ताकीद दिली.

8


परंतू बार्तीमय गप्प राहिला नाही. तो न थांबता ओरडत राहिला. अचानक येशू थांबला ! त्याने ऐकले !
9


त्या आंधळ्याला त्याच्याकडे आणण्याची त्याने आज्ञा केली. तेंव्हा लोक बार्तीमयला म्हणाले, "धीर धर, उठ, तो तुला बोलावीत आहे."
10


तेंव्हा तो आपले वस्त्रे टाकून उठला व येशूकडे आला.
11


येशूने त्याला विचारले, "मी तुझ्यासाठी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?" तुम्ही काय उत्तर दिले असते. तुम्ही खूप पैसा आणि चांगले कपडे मागितले असते का? बार्तीमयला देखिल हेच हवे होते का?
12


नाही, आंधळ्या बार्तीमयने येशूकडे सोने किंवा चांगले कपडे मागितले नाही. त्याला काय हवे होते हे तुम्हांला माहित आहे.
13


"प्रभू, मला दृष्टि प्राप्त व्हावी." बार्तीमयला पाहायचे होते. त्याला झाडे आणि पक्षी आणि देवाने बनवलेली सुंदर सृष्टी पाहायची होती.
14













येशू आंधळ्याला बरे करतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मार्क १०, लूक १८, योहान ९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!